# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**विधान भवन, नागपूर येथे होणाऱ्या अधिवेशनकालावधीत अभिलेखे व संगणकीय प्रणालीच्या वाहतूकीकरिता ६ कंटेनर व १ (४०७-ट्रक) पुरविण्यासंदर्भात...**

सन-२०२५ च्या हिवाळी अधिवेशनाकरिता या सचिवालयातील अतिमहत्वाचे अभिलेखे व संगणकीय प्रणाली विधान भवन, नागपूर येथे ने-आण करण्याकरिता ६ कंटेनर व १ (४०७-ट्रक) हमालीसह कंटेनरने व ट्रकने वाहतुक करण्याकरिता या क्षेत्रातील पुरवठदार/ठेकेदार यांचेकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

६ कंटेनर व १ (४०७-ट्रक) हमालीसह कंटेनरने व ट्रकने वाहतुक दरपत्रक भरण्यापूर्वी खालील कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.

१. वस्तू व सेवाकर (GST) प्रमाणपत्र.
२. पॅन कार्ड.
३. यापूर्वी ट्रक/कंटेनर पुरवठ्याचा अनुभवाचा दाखला (शासकीय/ निमशासकीय) यापूर्वी विधानमंडळ सचिवालयात सदरचे काम केले असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
४. सन २०२२-२०२३, २०२३-२०२४, व २०२४-२०२५ या तीन वर्षाचे आयकर प्रमाणपत्र.
५. दुकाने व आस्थापना कायद्यांतर्गत नोंदणी अथवा उद्योग आधार प्रमाणपत्राची प्रत.

वरील नमूद आवश्यक कागदपत्रे व दरपत्रक मोहरबंद पाकीटातून सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई या पत्त्यावर दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५ रोजी किंवा तत्पूर्वी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावे.

दरपत्रक स्वीकृत झाल्यास त्यानुसार आपणास कळविण्यात येईल. मात्र कोणतेही दरपत्रक स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार या सचिवालयाने राखून ठेवला आहे. कृपया यांची नोंद घ्यावी, ही विनंती.

**सचिव-४,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
**विधान भवन, मुंबई.**